नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १० Issue - 10 | वार - गुरुवार दि. ४ जून २०२६ Blow- Thursday Date 4 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# दिल्लीत अग्नितांडव; २१ जणांचा होरपळून मृत्यू

## ८ जण गंभीर जखमी; जीव वाचवण्यासाठी आटापिटा, इमारतीवरून मारल्या उड्या ; दिल्लीतील मालवीयनगरमध्ये रेस्टॉरंटला लागली आग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राजधानी दिल्ली येथील मालवीय नगरमध्ये भीषण आगीची भीषण समोर आली आहे. एका हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत आत्तापर्यंत होरपळून २१ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. दिल्लीतील लेमन ग्रीन नावाच्या रेस्टॉरंटमध्ये आज (बुधवार, ता ३) सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. याबाबत माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन सेवा ने घटनास्थळी धाव घेतली, त्यानंतर येथील इमारतीमधून ३७ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. मात्र, या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला असून अनेक लोक गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना सध्या जवळील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर या घटनेचे अनेक फोटो व्हिडीओ समोर आले आहेत.

या आगीच्या घटनेबाबत माहिती देताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, इमारतीत आग वेगाने पसरल्यानंतर बाहेर पडण्याचे सर्व मार्ग बंद झाले होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी इमारती समोरील जमिनीवर गाद्या टाकून बचावाची व्यवस्था केली. त्यानंतर अनेकांनी जीव वाचवण्यासाठी बाल्कनी, खिडक्या आणि इमारतीच्यावरच्या मजल्यांवरून खाली उड्या मारल्या. दरम्यान, निवासी भागांमध्ये किती हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना व्यवसायासाठी परवाना देण्यात आला आहे, याबाबतची माहिती महानगरपालिका प्रशासनाकडे मागवण्यात आली आहे. तसेच अशा



सर्व आस्थापनांची नियमित तपासणी करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दिल्लीतील मालवीय नगर येथील रेस्टॉरंटला लागलेल्या भीषण आगीत २१ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेबाबत माहिती देताना मालवीय नगर विधानसभा मतदारसंघाचे माजी आम आदमी पक्षाचे आमदार सोमनाथ भारती यांनी सांगितले की, शुक्रवारी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. त्यांच्या माहितीनुसार, आग प्रथम रेस्टॉरंटच्या स्वयंपाकघरात लागली आणि त्यानंतर ती शेजारील हॉटेलच्या वरच्या मजल्यांपर्यंत वेगाने पसरली. आग आणि धुरामुळे अनेक जण प्रभावित झाले. घटनास्थळी बचावकार्य सुरू असून आपणही या बचाव मोहिमेत सहभागी असल्याचे भारती यांनी सांगितले. या दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांना दिल्ली सरकारने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करून आगीमागील नेमके कारण आणि जबाबदार घटकांचा शोध घेण्यात यावा, असेही त्यांनी म्हटले.

दिल्लीतील मालवीय नगर येथील भीषण अग्नितांडवाबाबत प्रत्यक्षदर्शी आणि स्थानिक रहिवासी ओम यांनी धक्कादायक माहिती दिली आहे. त्यांनी सांगितले की, सकाळी सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास आग अत्यंत भीषण स्वरूप धारण करून होती. त्या वेळी मी आणि माझा मित्र स्कूटरवरून जात होतो. तेव्हा संपूर्ण इमारत आगीच्या ज्वाळांनी वेढलेली दिसत होती. जीव वाचवण्यासाठी अनेकजण इमारतीच्या वेगवेगळ्या भागांतून खाली उड्या मारत होते. आम्ही स्वतः किमान पाच जणांना इमारतीवरून उड्या मारताना पाहिले असे ओम यांनी सांगितले.

या गोंधळात एका व्यक्तीचा पाय तुटल्याचेही त्यांनी नमूद केले. घटनेनंतर परिसरातील रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती, तर घटनास्थळी नागरिकांची प्रचंड गर्दी जमली होती. परिस्थिती अत्यंत भयावह होती. सर्वत्र धूर, आगीच्या ज्वाळा आणि नागरिकांचा आरडाओरडा सुरू होता, असेही ओम यांनी सांगितले.

# कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदी डी. के. शिवकुमार यांची वर्णी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बंगळुरू : कर्नाटकमध्ये डी. के. शिवकुमार यांच्या नेतृत्वात नव्या सरकारचा शपथविधी झाला. राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी डी. के. शिवकुमार यांना मुख्यमंत्रिपदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली. यानंतर राज्यपालांनी डी. के. शिवकुमार यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. बंगळुरू येथील लोकभवनात संध्याकाळी शपथविधीचा सोहळा झाला. कर्नाटकमधील डी. के. शिवकुमार यांच्या सरकारमध्ये वोक्कालिगा, दलित, लिंगायत, मुस्लिम, ख्रिश्चन, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय समुदायांना प्रतिनिधित्व देत सामाजिक संतुलन साधल्याचे काँग्रेसच्यावतीने सांगण्यात आले. मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार स्वतः वोक्कालिगा समुदायाचे आहेत, तर उपमुख्यमंत्री जी. परमेश्वर हे दलित आहेत; ही माहिती पण काँग्रेसकडून देण्यात



आली.

डॉ. जी. परमेश्वरा यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. ते राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून काम करतील. केएच मुनियप्पा, केजे जॉर्ज, एमबी पाटील, रामलिंगा रेड्डी, सतीश जारकीहोली, कृष्णा बायरे गौडा, प्रियांक खर्गे, यूटी खादर, ईश्वर खांद्रे, यतींद्रामा पाटील आणि सुदरेश पाटील यांनीही कर्नाटक सरकारमध्ये मंत्रिपदाची शपथ घेतली.

याआधी काँग्रेसमधील अंतर्गत नाराजी वाढू लागल्याचे पाहून मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी पदाचा राजीनामा दिला. यानंतर सिद्धरामय्या, डी. के. शिवकुमार आणि कर्नाटक काँग्रेसमधील प्रमुख नेत्यांनी दिल्लीत काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांशी चर्चा केली. या चर्चेअंती डी. के. शिवकुमार यांची मुख्यमंत्रिपदी निवड झाली. पक्ष नेत्यांचे आदेश आल्यानंतर कर्नाटक काँग्रेसच्या आमदारांची बैठक झाली. या बैठकीत एकमत झाल्यानंतर डी. के. शिवकुमार यांची विधिमंडळनेतेपदी एकमताने निवड झाली. नंतर शिवकुमार यांनी राज्यपालांची भेट घेतली. राज्यपालांनी शिवकुमार यांना बुधवार ३ जून २०२६ रोजी संध्याकाळी शपथविधी देणार असल्याचे प्रसिद्धीपत्रक काढून जाहीर केले. यानंतर जाहीर केलेल्या सरकारी कार्यक्रमानुसार डी. के. शिवकुमार यांना कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणून राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. काँग्रेसचे डी. के. शिवकुमार हे देशातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री आहेत. त्यांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार त्यांच्याकडे एकूण एक हजार ४१३ कोटी रुपयांची संपत्ती आहे. यानंतर दुसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत मुख्यमंत्री म्हणून आंध्र प्रदेशच्या एन. चंद्राबाबू नायडू यांचे नाव येते, त्यांच्याकडे ९३१ कोटी रुपयांची संपत्ती आहे. श्रीमंत मुख्यमंत्र्यांच्या यादीत तिसऱ्या स्थानावर टीव्हीकेचे संस्थापक अध्यक्ष आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय आहेत, त्यांच्याकडे ६४८ कोटी रुपयांची संपत्ती आहे. डी. के. शिवकुमार हे १९८९ पासून सलग आठ वेळा विधानसभेची निवडणूक जिंकले आहेत. कर्नाटकमधील कनकपुरा मतदारसंघावर त्यांची उत्तम पकड आहे. कनकपुराचे रॉकस्टार किंवा कनकपुरा बांदा या नावांनीही ते ओळखले जातात. राजकारणी असण्याव्यतिरिक्त ते उत्तम व्यावसायिक आहेत. त्यांना काँग्रेस पक्षाचे संकटमोचक असेही म्हणतात.

# मुलीला वाचविण्यासाठी युवकांची तुंगभद्रा नदीत उडी; मुलगी बचावली पण ५ जण बुडाले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद : देव तारी त्याला कोण मारी... असं म्हणतात, आंध्र प्रदेशमधील कुरनुलमध्ये अशीच एक घटना घडली आहे. पाण्यात बुडणारी एक चिमुकली बचावली पण तिला वाचवण्यासाठी नदीत उडी घेणारे तरुण मात्र बुडाल्याची हृदयद्रावक घटना घडली. पाण्यात बुडणाऱ्या मुलीला वाचविताना ती मुलगी बचावली पण तिला वाचविण्यासाठी पाण्यात उतरलेले पाचही जण पाण्यात बुडाल्याची दुर्घटना घडली आहे. या घटनेनं सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. आंध्र प्रदेशच्या कुरनूलमध्ये शनिवारी तुंगभद्रा नदीत पाय धुताना तोल गेल्याने नदीत घसरून एक मुलगी जोरदार प्रवाहात वाहू लागली, त्यानंतर मुलीच्या बचावासाठी आवाज देण्यात आला, तिला वाचवण्यासाठी धावा करण्यात आला. त्यामुळे, मुलीला वाचविण्यासाठी ४ ते ५ जणांनी पाण्यात उडी घेतली. मात्र, मुलीला वाचविण्यासाठी पाण्यात उडी घेतलेले सर्वजण बुडाल्याची दुःखद घटना घडली.

कुरनूल येथील तुंगभ्रदा नदीत ३१ मे रोजी शनिवारी सायंकाळी ४.३० वाजता अल्पवयीन मुलगी नदीत आपले हात-पाय धुण्यासाठी गेली होती. मात्र, पाय धुताना तिचा तोल गेल्याने ती नदीत पडली, त्यानंतर ती नदीच्या पाण्याच्या प्रवाहात वाहून जात बुडू लागली. त्यामुळे, स्थानिक आणि तिच्या कुटुंबीयांकडून मुलीच्या बचावासाठी धावा करण्यात आला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तेथील ४ ते ५ जणांनी तात्काळ नदीत उड्या घेतल्या. मुलीला वाचविण्यासाठी सर्वांचीच धडपड दिसून आली. पाण्यात पडलेल्या मुलीला वाचविण्यासाठी ५ जणांनी नदीत उडी घेतली. या मुलांकडून मुलीला वाचवण्यात यश आलं, पण हे पाचही जण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. पाण्यात बुडालेले सर्वचजण शेजारील गावातील रहिवाशी असल्याची माहिती आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन (एसडीआरएफ) च्या पथकाला माहिती मिळताच पथकाने घटनास्थळी धाव घेतली. नदीत उतरुन बुडालेल्या तरुणांचा शोध घेण्यात आला. मात्र, या दुर्दैवी घटनेत पाचही मुलांचा नदीत बुडून मृत्यू झाल्याची माहिती आहे.



## संपादकीय....

# आर्त टाहो अन् तांडव

राजधानी दिल्ली येथील मालवीय नगरमध्ये भीषण आगीची भीषण समोर आली आहे. एका हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत आत्तापर्यंत होरपळून २१ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. दिल्लीतील लेमन ग्रीन नावाच्या रेस्टॉरंटमध्ये आज (बुधवार, ता ३) सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. याबाबत माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन सेवा ने घटनास्थळी धाव घेतली, त्यानंतर येथील इमारतीमधून ३७ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. मात्र, या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला असून अनेक लोक गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना सध्या जवळील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर या घटनेचे अनेक फोटो व्हिडीओ समोर आले आहेत.

इमारतीत आग वेगाने पसरल्यानंतर बाहेर पडण्याचे सर्व मार्ग बंद झाले होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी इमारती समोरील जमिनीवर गाद्या टाकून बचावाची व्यवस्था केली. त्यानंतर अनेकांनी जीव वाचवण्यासाठी बाल्कनी, खिडक्या आणि इमारतीच्यावरच्या मजल्यांवरून खाली उड्या मारल्या. दरम्यान, निवासी भागांमध्ये किती हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना व्यवसायासाठी परवाना देण्यात आला आहे, याबाबतची माहिती महानगरपालिका प्रशासनाकडे मागवण्यात आली आहे. तसेच अशा सर्व आस्थापनांची नियमित तपासणी करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दिल्लीतील मालवीय नगर येथील रेस्टॉरंटला लागलेल्या भीषण आगीत २१ जणांचा मृत्यू झाला आहे. शुक्रवारी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. आग प्रथम रेस्टॉरंटच्या स्वयंपाकघरात लागली आणि त्यानंतर ती शेजारील हॉटेलच्या वरच्या मजल्यांपर्यंत वेगाने पसरली. आग आणि धुरामुळे अनेक जण प्रभावित झाले. घटनास्थळी बचावकार्य सुरू होते. तसेच या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करून आगीमागील नेमके कारण आणि जबाबदार घटकांचा शोध घेण्यात यावा, असे नागरिकांतून मागणी होत होती. दिल्लीतील मालवीय नगर येथील भीषण अग्नितांडवाबाबत प्रत्यक्षदर्शी आणि स्थानिक रहिवाश्यांनी माहिती दिली आहे. त्यांनी सांगितले की, सकाळी सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास आग अत्यंत भीषण स्वरूप धारण करून होती. त्या वेळी मी आणि माझा मित्र स्कूटरवरून जात होतो. तेव्हा संपूर्ण इमारत आगीच्या ज्वाळांनी वेढलेली दिसत होती. जीव वाचवण्यासाठी अनेकजण इमारतीच्या वेगवेगळ्या भागांतून खाली उड्या मारत होते.

# बोपगांव येथे कृषि विभागाच्या वतीने खरीप हंगाम पूर्व नियोजन बैठक संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : महाराष्ट्र शासन कृषी विभाग व ग्राम पंचायत कार्यालय, बोपगाव यांच्या वतीने खरीप हंगाम पूर्व नियोजन बैठक ग्रामपंचायत बोपगाव येथे बुधवार दिनांक ०३/०६/२०२६ रोजी ठीक सकाळी ०९.३० वाजता. चांबळी व बोपगाव गावातील शेतकरी बंधूसाठी खरीप हंगाम पूर्व नियोजन २०२६ बैठकीचे आयोजन केले होते.

सदर बैठकीला मार्गदर्शन तथा प्रात्यक्षिक करिता कृषी विभागाचे प्रमुख मार्गदर्शक श्री अंकुश बरडे साहेब नोडल अधिकारी पुणे जिल्हा, श्री श्रीधर चव्हाण तालुका कृषी अधिकारी पुरंदर, श्री रवींद्र खेसे मंडळ कृषी अधिकारी सासवड, श्री.संदीप कदम उप कृषी अधिकारी,अतुल हिंगणे सहाय्यक कृषी अधिकारी, मयुर साळुंखे समन्वयक पाणी फाउंडेशन. यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

पुढील प्रमाणे विषयावर मार्गदर्शन केले

१. *वाटाणा पीक तंत्रज्ञान ( मुळकुज, काळी बुरशी, भेसळ डोस इ.)

२. जैविक बीज प्रक्रिया व बीज उगवण क्षमता चाचणी

३. कृषी विषयक शेतकरी लाभ योजना ( उद्दढ अंतर्गत व फळबाग लागवड)

४. शेतकरी परिसंवाद

५. पाणी फाउंडेशन ( जलसंधारण, सत्यमेव जयते फार्मर्स कप पीक स्पर्धा)

६. विविध कृषी विभागाच्या योजना, फुल शेती मार्गदर्शन, प्लास्टिक मुलचिंग, शेती तण नियंत्रण आच्छादन, खरीप पेरणी पूर्व नियोजन. अल निनो व मान्सून व मान्सून पूर्व पाऊस माहिती.

या बैठकीला मौजे बोपगाव येथील शेतकरी, प्रगतशील शेतकरी, हिला व पुरुष शेतकरी बचत गट, कृषी व पशु सखी, बचत गट उठझ, आजी माजी सरपंच सदस्य, प्रतिष्ठित नागरिक( शेतकरी), वि.वि. कार्यकारी सोसायटी चेअरमन व्हा. चेअरमन व सभासद, शेतकरी उत्पादक कंपनी, शेत मजूर व बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर बैठकीचे प्रास्ताविक कृषि सहाय्यक विजय जाधव यांनी केले व सूत्रसंचालन विनायक गायकवाड पोलीस पाटील बोपगांव यांनी केले.

# निष्पाप बालपणावर आक्रमकतेची सावली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी ४ जून हा दिवस जगभरात आक्रमकतेचे बळी ठरलेल्या निष्पाप मुलांचा आंतरराष्ट्रीय दिन म्हणून पाळला जातो. हा दिवस केवळ दिनदर्शिकेतील एक औपचारिक नोंद नाही, तर मानवी संवेदनशीलतेला जागृत करणारा, जगाच्या विवेकाला प्रश्न विचारणारा आणि बालहक्कांच्या संरक्षणासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. जगात जेव्हा जेव्हा युद्धे, दहशतवादी हल्ले, सशस्त्र संघर्ष, जातीय हिंसाचार, धार्मिक संघर्ष किंवा कोणत्याही प्रकारची आक्रमकता निर्माण होते, तेव्हा त्याचे सर्वाधिक गंभीर परिणाम निरपराध मुलांवर होतात. ज्या वयात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि रंगीत स्वप्ने असावीत, त्या वयात अनेक मुलांच्या हातात भीती, असुरक्षितता आणि वेदना येतात. त्यांचे बालपण हिरावले जाते, शिक्षण खंडित होते, कुटुंबे तुटतात आणि भविष्य अंधकारमय बनते. या सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचार करण्यासाठी आणि जगभरातील बालकांच्या संरक्षणासाठी जागतिक स्तरावर जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो.

या आंतरराष्ट्रीय दिनाची सुरुवात १९८२ मध्ये झाली. त्या काळात मध्यपूर्वेतील संघर्षांमध्ये विशेषतः लेबनॉन आणि पॅलेस्टाईन भागातील अनेक निष्पाप मुलांचा मृत्यू झाला होता. युद्धाच्या भयावहतेमुळे हजारो बालके जखमी झाली, बेघर झाली आणि मानसिक आघाताची शिकार झाली. या घटनांनी संपूर्ण जगाला हादरवून सोडले. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ४ जून हा दिवस आक्रमकतेचे बळी ठरलेल्या मुलांच्या स्मरणार्थ आणि त्यांच्या संरक्षणासाठी जागतिक प्रयत्नांना बळ देण्यासाठी घोषित केला. कालांतराने या दिवसाचा आशय अधिक व्यापक झाला. आज हा दिवस केवळ युद्धग्रस्त मुलांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर कोणत्याही प्रकारच्या हिंसा, अत्याचार, शोषण, दडपशाही आणि आक्रमकतेचा बळी ठरलेल्या सर्व मुलांच्या संरक्षणासाठी समर्पित आहे.

बालपण हा मानवी जीवनाचा सर्वात नाजूक आणि महत्त्वाचा टप्पा असतो. याच काळात मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत असते, त्यांची मानसिकता विकसित होत असते आणि त्यांच्या भविष्याचा पाया रचला जात असतो. प्रत्येक मुलाला प्रेम, माया, संरक्षण, शिक्षण, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. परंतु वास्तवात जगातील लाखो मुले या मूलभूत अधिकारांपासून वंचित आहेत. संघर्ष, हिंसा आणि आक्रमकतेमुळे त्यांचे बालपण उद्ध्वस्त होत आहे. जगात घडणाऱ्या प्रत्येक युद्धाचा आणि प्रत्येक हिंसक घटनेचा सर्वात मोठा फटका मुलांनाच बसतो.

युद्ध हा मानवतेसाठी सर्वात मोठा शाप मानला जातो. युद्धात केवळ सैनिकच मरत नाहीत, तर निरपराध नागरिकांचेदेखील मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यामध्ये मुलांचे प्रमाण लक्षणीय असते. युद्धामुळे घरे उद्ध्वस्त होतात, शाळा बंद पडतात, रुग्णालये नष्ट होतात आणि संपूर्ण सामाजिक व्यवस्था विस्कळीत होते. अशा परिस्थितीत मुलांना अन्न, पाणी, आरोग्यसेवा आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो. अनेक वेळा त्यांना आपले घर, गाव आणि देश सोडून निर्वासित म्हणून जगावे लागते.

युद्धग्रस्त प्रदेशांतील मुलांचे जीवन अत्यंत कठीण असते. सततचा गोळीबार, बॉम्बस्फोट, हवाई हल्ले आणि मृत्यूचे वातावरण त्यांच्या मनात कायमस्वरूपी भीती निर्माण करते. अनेक मुले आपल्या डोळ्यांसमोर आई-वडील, भाऊ-बहिण किंवा नातेवाईक गमावतात. काही मुले अनाथ होतात, तर काही कुटुंबापासून वेगळी होतात. अशा परिस्थितीत त्यांच्यावर होणारा मानसिक परिणाम अत्यंत गंभीर असतो. मानसशास्त्रज्ञांच्या मते, बालपणी अनुभवलेले युद्ध आणि हिंसाचार यांचे परिणाम व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यावर दिसून येतात.





युद्धामुळे शिक्षणावर होणारा परिणामही गंभीर असतो. शाळा उद्ध्वस्त झाल्यामुळे किंवा सुरक्षिततेच्या कारणास्तव बंद राहिल्यामुळे लाखो मुले शिक्षणापासून वंचित राहतात. शिक्षण ही मुलांच्या विकासाची सर्वात प्रभावी गुरुकिल्ली आहे. शिक्षणामुळेच त्यांना आत्मविश्वास, कौशल्ये आणि उज्ज्वल भविष्याची दिशा मिळते. परंतु संघर्षामुळे शिक्षण खंडित झाल्यास त्यांच्या जीवनातील अनेक संधी कायमच्या नष्ट होतात. अशा मुलांपैकी अनेकजण पुन्हा कधीही शाळेत जाऊ शकत नाहीत.

आक्रमकतेचा परिणाम केवळ युद्धापुरता मर्यादित नसतो. घरगुती हिंसा ही देखील मुलांवरील आक्रमकतेचे एक गंभीर रूप आहे. अनेक मुले स्वतःच्या घरात शारीरिक, मानसिक किंवा भावनिक अत्याचार सहन करतात. पालकांमधील सततचे वाद, व्यसनाधीनता, आर्थिक तणाव आणि कौटुंबिक कलह यांचा परिणाम मुलांच्या मानसिक आरोग्यावर होतो. घर हे मुलांसाठी सुरक्षिततेचे ठिकाण असले पाहिजे; परंतु जेव्हा घरच भीतीचे केंद्र बनते, तेव्हा मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर गंभीर परिणाम होतो.

बालकांवरील लैंगिक अत्याचार ही आधुनिक समाजातील अत्यंत गंभीर समस्या आहे. जगभरात लाखो मुले अशा अत्याचारांची शिकार होतात. या अत्याचारांमुळे त्यांच्या शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आणि भावनिक आरोग्यावरही खोल परिणाम होतो. अनेक वेळा पीडित मुले भीतीमुळे किंवा सामाजिक दबावामुळे आपले अनुभव व्यक्त करू शकत नाहीत. परिणामी त्यांचे दुःख अधिक वाढते. बालकांच्या सुरक्षिततेसाठी कुटुंब, शाळा, समाज आणि शासन या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

बालमजुरी हे देखील मुलांच्या हक्कांचे गंभीर उल्लंघन आहे. जगातील अनेक भागांमध्ये अजूनही लाखो मुले काम करण्यास भाग पाडली जातात. गरिबी, बेरोजगारी आणि सामाजिक विषमता यांमुळे कुटुंबांना आपल्या मुलांना शिक्षणाऐवजी कामावर पाठवावे लागते. कारखाने, खाणी, बांधकाम क्षेत्र, शेती आणि घरगुती कामांमध्ये गुंतलेली ही मुले अनेकदा अमानुष परिस्थितीत काम करतात. त्यांचे शिक्षण थांबते, आरोग्य बिघडते आणि बालपण हिरावले जाते.

मानवतस्करी ही मुलांसाठी आणखी एक गंभीर समस्या आहे. अनेक मुलांना फसवून, अपहरण करून किंवा गरिबीचा फायदा घेऊन तस्करीच्या जाळ्यात अडकवले जाते. त्यांचा वापर सक्तीच्या मजुरीसाठी, लैंगिक शोषणासाठी, भीक मागण्यासाठी किंवा गुन्हेगारी कारवायांसाठी केला जातो. अशा मुलांचे जीवन पूर्णपणे उद्ध्वस्त होते. त्यांना स्वातंत्र्य, शिक्षण आणि सन्मानाने जगण्याच्या संधींपासून वंचित राहावे लागते.

तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे मुलांसमोर नवीन प्रकारची आव्हाने उभी राहिली आहेत. इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे संवाद आणि ज्ञानाची नवी क्षितिजे खुली झाली असली तरी सायबर बुलिंग, ऑनलाइन छळ, डिजिटल फसवणूक आणि इंटरनेटद्वारे होणारे शोषण या समस्या वाढल्या आहेत. अनेक मुले सोशल मीडियावर अपमानास्पद संदेश, धमक्या किंवा मानसिक छळाला सामोरे जातात. या प्रकारच्या अनुभवांचा त्यांच्या आत्मविश्वासावर आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.

संघर्ष आणि हिंसाचारामुळे निर्माण होणाऱ्या निर्वासितांच्या समस्येत मुलांचे प्रमाण खूप मोठे आहे. जेव्हा कुटुंबांना आपले घर सोडून सुरक्षिततेसाठी दुसरीकडे जावे लागते, तेव्हा मुलांचे जीवन पूर्णपणे बदलून जाते. त्यांना नवीन वातावरणाशी जुळवून घ्यावे लागते. अनेक वेळा त्यांच्याकडे अन्न, पाणी, निवारा आणि शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नसतात. निर्वासित छावण्यांमध्ये राहणाऱ्या मुलांना अनेक सामाजिक आणि मानसिक अडचणींना सामोरे जावे लागते.

बालकांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक महत्त्वपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. संयुक्त राष्ट्रांनी बालहक्कांच्या संरक्षणासाठी विविध करार आणि धोरणे स्वीकारली आहेत. बालकांना जीवन, शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि विकासाचा अधिकार आहे, ही संकल्पना आज जागतिक स्तरावर मान्य झाली आहे. तरीही अनेक देशांमध्ये या हक्कांची अंमलबजावणी अपुरी आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि प्रभावी धोरणांची आवश्यकता कायम आहे.

बालकांच्या संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या अनेक आंतरराष्ट्रीय संस्था संघर्षग्रस्त आणि अत्याचारग्रस्त मुलांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. शिक्षण, पोषण, आरोग्यसेवा, मानसिक आधार आणि पुनर्वसन कार्यक्रमांच्या माध्यमातून लाखो मुलांना नवजीवन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि, समस्या इतकी व्यापक आहे की केवळ संस्थांचे प्रयत्न पुरेसे नाहीत. संपूर्ण समाजाने या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

भारततही बालसंरक्षणासाठी विविध कायदे आणि योजना अस्तित्वात आहेत. बालमजुरी प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध, शिक्षणाचा अधिकार, लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण आणि बालहक्क संवर्धन यांसाठी अनेक कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. विविध शासकीय आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून मुलांच्या कल्याणासाठी अनेक कार्यक्रम राबविले जात आहेत. तरीही सामाजिक विषमता, गरिबी, अशिक्षण आणि जागरूकतेचा अभाव यांमुळे अनेक आव्हाने कायम आहेत.

बालसंरक्षणामध्ये कुटुंबाची भूमिका सर्वात महत्त्वाची असते. मुलांना प्रेम, विश्वास आणि सुरक्षिततेचे वातावरण मिळणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांशी नियमित संवाद साधला पाहिजे, त्यांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत आणि त्यांना कोणत्याही प्रकारच्या अत्याचाराविरोधात बोलण्याचे धैर्य दिले पाहिजे. मुलांच्या मनातील भीती, ताण किंवा अस्वस्थता वेळेवर ओळखणे आणि त्यांना योग्य आधार देणे अत्यंत आवश्यक आहे.

शाळा आणि शिक्षक यांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. शाळांनी सुरक्षित, समावेशक आणि संवेदनशील वातावरण निर्माण केले पाहिजे. विद्यार्थ्यांना मानवता, शांतता, सहिष्णुता आणि बालहक्क यांविषयी शिक्षण दिले पाहिजे. शाळांमध्ये समुपदेशन सेवा, तक्रार निवारण यंत्रणा आणि बालसंरक्षण धोरणे प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

प्रसारमाध्यमे समाजात जागरूकता निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहेत. बालकांवरील अत्याचारांच्या घटनांविषयी संवेदनशील आणि जबाबदार वृत्तांकन करून समाजाला जागृत करता येते. तसेच बालसंरक्षणाविषयी सकारात्मक संदेश देऊन लोकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करता येते. माध्यमांनी मुलांच्या गोपनीयतेचे संरक्षण करताना त्यांच्या सन्मानाचे जतन करणेही तितकेच आवश्यक आहे.

आक्रमकतेचे बळी ठरलेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नसते. त्यांना भावनिक आधार, मानसिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि सामाजिक स्वीकाराची आवश्यकता असते. कला, संगीत, क्रीडा, साहित्य आणि विविध सर्जनशील उपक्रमांच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करता येतो. त्यांना पुन्हा सामान्य जीवनाकडे आणण्यासाठी समाजाने संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करणे गरजेचे आहे.

शांतता, सहिष्णुता आणि मानवता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मिती ही मुलांच्या संरक्षणासाठी अत्यावश्यक आहे. जगातील कोणत्याही कोपऱ्यातील हिंसा आणि संघर्षाचा परिणाम शेवटी निष्पाप मुलांवर होतो. त्यामुळे युद्धाऐवजी संवाद, द्वेषाऐवजी सहकार्य आणि हिंसेऐवजी मानवतेचा मार्ग स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

४ जून रोजी साजरा होणारा 'आक्रमकतेचे बळी ठरलेल्या निष्पाप मुलांचा आंतरराष्ट्रीय दिन' आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की मुलांचे संरक्षण ही केवळ कायद्याची किंवा शासनाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक मुलाला सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि आनंदी बालपण मिळाले पाहिजे. त्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने जपणे, त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य कायम ठेवणे आणि त्यांना भीतीमुक्त वातावरण देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

आजच्या या निमित्ताने आपण असा संकल्प करूया की कोणत्याही मुलाला हिंसा, शोषण किंवा आक्रमकतेचे बळी ठरावे लागणार नाही. प्रत्येक बालकाला शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि विकासाच्या समान संधी मिळतील. कारण मुलांचे बालपण सुरक्षित असेल तरच मानवतेचे भविष्य सुरक्षित राहील. निष्पाप मुलांचे संरक्षण म्हणजे केवळ एका पिढीचे संरक्षण नाही, तर संपूर्ण जगाच्या उद्याचे संरक्षण आहे. म्हणूनच या आंतरराष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून बालहक्कांच्या रक्षणासाठी आणि हिंसामुक्त, न्याय्य व संवेदनशील समाजनिर्मितीसाठी प्रत्येकाने आपले योगदान देणे हीच काळाची खरी गरज आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

# विभक्त कुटुंब पद्धती : स्वातंत्र्य की भावनिक दुरावा?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय संस्कृतीत संयुक्त कुटुंब पद्धतीला विशेष महत्त्व होते. एकाच छताखाली अनेक पिढ्या राहून सुख-दुःख वाटून घेत असत. मात्र बदलती जीवनशैली, वाढते शहरीकरण, आर्थिक स्वावलंबन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अपेक्षा यांमुळे आज विभक्त कुटुंब पद्धती मोठ्या प्रमाणात वाढताना दिसते. या पद्धतीमुळे काही सकारात्मक बदल घडले असले, तरी नातेसंबंधांमधील दुरावा आणि भावनिक एकाकीपणाची समस्याही निर्माण झाली आहे.विभक्त कुटुंब पद्धतीमुळे काही प्रमाणात स्वातंत्र्य आणि वैयक्तिक विकासाच्या संधी वाढल्या असल्या, तरी त्याचे काही गंभीर सामाजिक परिणामही दिसून येतात.

आजी-आजोबांपासून दुरावा हा त्यातील सर्वात महत्त्वाचा परिणाम आहे. पूर्वी घरातील ज्येष्ठ व्यक्ती अनुभव, संस्कार आणि प्रेमाचा खजिना असायच्या. त्यांच्या सहवासातून मुलांना जीवनमूल्ये, परंपरा आणि संस्कृतीची ओळख होत असे. आज मात्र अनेक नातवंडे आपल्या आजी-आजोबांपासून दूर राहत असल्याने हा भावनिक बंध कमकुवत होत चालला आहे.आजी-आजोबांच्या गोष्टी, त्यांचे लाड, त्यांचे मार्गदर्शन आणि निरपेक्ष प्रेम यांचा अनुभव अनेक मुलांना मिळत नाही. त्यामुळे मुलांच्या भावनिक जडणघडणीतील एक महत्त्वाचा आधार हरवत आहे.घरातील सर्व जबाबदाऱ्या मोजक्या व्यक्तींवर येतात. मुलांचे संगोपन, नोकरी, घरकाम आणि आर्थिक नियोजन यांचा ताळमेळ साधताना पालकांवर मानसिक ताण वाढतो. संयुक्त कुटुंबात या जबाबदाऱ्या वाटून घेतल्या जात असल्याने तणावाचे प्रमाण तुलनेने कमी असते. घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या अनुभवातून अनेक प्रश्नांची उत्तरे मिळत असत. आजच्या तरुण पिढीसमोर करिअर, नातेसंबंध, सामाजिक जबाबदाऱ्या आणि जीवनातील आव्हाने यांसंदर्भात अनेक प्रश्न असतात. मात्र योग्य वेळी अनुभवी मार्गदर्शन न मिळाल्याने अनेक तरुण संभ्रमित होतात किंवा चुकीचे निर्णय घेतात.विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये अनेकदा एकल पालकत्व (डळपसश्रश झरीशपींळपस) ही परिस्थिती निर्माण होते. अशावेळी मुलांच्या संगोपनाची, शिक्षणाची, आर्थिक व्यवस्थेची आणि भावनिक आधाराची संपूर्ण जबाबदारी एका व्यक्तीवर येते. या जबाबदाऱ्यांचा ताण मोठा असतो आणि त्याचा परिणाम पालकांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावरही होऊ शकतो. त्यामुळे मुलांना अनेकदा आपुलकी, जिव्हाळा आणि कौटुंबिक आधार कमी प्रमाणात मिळतो.

तसेच वाढत्या जबाबदाऱ्या, वेळेचा अभाव आणि मानसिक तणाव यांमुळे सततची चिडचिड आणि अस्वस्थता निर्माण होण्याची शक्यता असते. लहान-सहान गोष्टींवरून वाद होणे, संयम कमी होणे आणि संवादात कटुता येणे हे अनेक कुटुंबांमध्ये दिसून येते. अशा वातावरणाचा परिणाम मुलांच्या मनावरही होतो आणि त्यांच्या स्वभावावर, आत्मविश्वासावर तसेच नातेसंबंधांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर प्रभाव पडतो. आजही अनेक ठिकाणी मुलींना परक्या घरचे धन म्हणून पाहिले जाते. विवाहानंतर तिचे आयुष्य दुसऱ्या घराशी जोडले जाणार असल्याची भावना लहानपणापासूनच तिच्या मनात रुजवली जाते. त्यामुळे अनेक मुली शिक्षण, करिअर आणि आर्थिक स्वावलंबनाला अधिक महत्त्व देऊ लागल्या आहेत. उद्याच्या अनिश्चित परिस्थितीत स्वतःच्या पायावर उभे राहणे ही काळाची गरज बनली आहे.

तसेच आजकाल कौटुंबिक वाद झाल्यास हे काय तुझ्या बापाचे घर आहे का? किंवा या घरावर आमचे नाव आहे अशा टोमण्यांमुळे नात्यांमध्ये कटुता निर्माण होताना दिसते. घर हे केवळ मालकी हक्काचे प्रतीक नसून प्रेम, विश्वास आणि आपलेपणाचे केंद्र असते. मात्र जेव्हा मालकी आणि अहंकार नात्यांपेक्षा मोठे होतात, तेव्हा कुटुंबाचे विघटन होण्यास सुरुवात होते.याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीने स्वतंत्र घर निर्माण करावे असा नाही. अनेक घरे उभी राहू शकतात, पण त्यातून केवळ वास्तू निर्माण होतील; घरपण येणार नाही.

प्रत्येकाने स्वातंत्र्याबरोबरच कुटुंबातील नात्यांची ऊब जपली पाहिजे. कारण मोठी घरे उभारणे सोपे आहे, पण माणुसकीने भरलेले घर निर्माण करणे हेच खरे आव्हान आहे. शेवटी, कुटुंब एकत्र राहो किंवा विभक्त, नात्यांमधील प्रेम आणि आपलेपणाटिकून राहणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे.

**– कु.उर्वशी मनिष संघवी,**
**मुर्तिजापूर,जि.अकोला**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अवैध मद्यनिर्मितीवर कठोर कारवाई करण्याचे जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांचे आदेश

## विषारी मद्याविरोधात सोलापूर जिल्ह्यात विशेष मोहीम...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : पुणे येथे मिथेनॉलमिश्रित विषारी मद्य प्राशनामुळे घडलेल्या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, गावठी दारू विक्री आणि मिथेनॉलच्या गैरवापराविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या समन्वयाने विशेष प्रतिबंधात्मक मोहीम राबवण्यात येत आहे. या संदर्भात पोलीस विभागासह सर्व संबंधित यंत्रणांनी संयुक्त व प्राधान्याने कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिले आहेत.

**मिथेनॉल अत्यंत घातक असल्याचा इशारा–**

पुणे येथील घटनेत मिथेनॉल या विषारी रसायनाचा वापर झाल्याचे निदर्शनास आले आहे. मिथेनॉल हे अत्यंत धोकादायक असून त्याच्या सेवनामुळे कायमस्वरूपी अंधत्व, कोमात जाणे, मूत्रपिंड निकामी होणे तसेच मृत्यू होण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

यामुळे नागरिकांनी अवैध मद्य, रसायन मिसळलेली दारू किंवा ढाबे/टपऱ्यांवर विनापरवाना विकल्या जाणाऱ्या मद्याचे सेवन टाळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांच्याकडून करण्यात आले आहे.

**जनजागृतीसाठी व्यापक प्रचार मोहीम:–**

मिथेनॉलयुक्त विषारी मद्याचे दुष्परिणाम आणि अवैध मद्यनिर्मितीबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध माध्यमांचा वापर केला जाणार आहे.

महानगरपालिका, नगर परिषद आणि नगर पंचायत यांना घंटागाड्यांद्वारे ध्वनीफीत प्रसारित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच विस्तृत प्रचार मोहीम राबवून अवैध मद्याचे धोके आणि कायदेशीर कारवाईबाबत माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवली जाणार आहे.

**वीजजोडण्यांवर 'तत्काळ' कारवाईचा निर्णय–**

अवैध हातभट्टी निर्मिती व विक्री केंद्रांवर होणाऱ्या उत्पादनाला आळा घालण्यासाठी अधिकृत किंवा अनधिकृत वीजजोडण्या तात्काळ खंडित करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. यासाठी महावितरण विभागाला राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या समन्वयाने संयुक्त कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

उत्पादन, खरेदी, साठवणूक आणि वितरणावर नजर–

मिथेनॉलचा गैरवापर रोखण्यासाठी उत्पादन, खरेदी, विक्री, साठवणूक आणि वितरण या सर्व टप्प्यांवर विशेष देखरेख ठेवली जाणार आहे.



संशयास्पद व्यवहार आढळल्यास संबंधितांवर तात्काळ फौजदारी कारवाई करण्याचे प्रशासनाचे स्पष्ट आदेश आहेत.

**गूळ खरेदी करणाऱ्यांचीही तपासणी–**

अवैध मद्यनिर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या गूळ खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर देखील तपासणी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गुळाचा वापर अवैध मद्यनिर्मितीसाठी होणार नाही याची खात्री करण्याबाबत व्यापाऱ्यांना प्रशासनाने सूचना/आवाहन केले आहे.

हातभट्टी निर्मितीचे उच्चाटन: संयुक्त मोहिमेची तीव्रता वाढवणार–

पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून संपूर्ण जिल्ह्यात संयुक्त कारवाया सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. हातभट्टीचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी या कारवायांची तीव्रता वाढवण्यात येणार आहे.

**दारुबंदी कायद्यानुसार सहकार्य बंधनकारक**

महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत अवैध मद्यनिर्मिती रोखण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी सहकार्य करणे बंधनकारक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. माहिती लपविणे किंवा सहकार्य न करणे यासारख्या बाबी आढळल्यास मानधन बंद तसेच शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

**नागरिकांनी दिलेली माहिती गोपनीय–**

विषारी रसायनांच्या गैरवापराबाबत किंवा अवैध मद्यनिर्मितीबाबत कोणतीही माहिती नागरिकांनी तात्काळ संबंधित विभागांना द्यावी असे आवाहन प्रशासनाने केले आहे. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल, असेही जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# तुगाव व उंडरगाव येथील प्रकरणातील तपास अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी यांना सह आरोपी करून सदर प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे द्यावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुगाव ता.उमरगा येथील दलित तरुणास मारहाण व उंडरगाव तालुका लोहारा येथील अल्पवयीन दलित मुलीचे अपहरण प्रकरणातील तपास अधिकारी यांना सह आरोपी करून त्वरित निलंबित करावे व सदर प्रकरणाचा तपास जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेकडे द्यावा असी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने धाराशीचे जिल्हाधिकारी यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

**रिपाइं (आठवले)ची मागणी**

रिपाइं (आठवले) च्या वतीने जिल्हाधिकारी धाराशिव यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की तुगाव ता.उमरगा येथील आंबेडकरी चळवळीतील दलित तरुण भालचंद्र चोकोबा कांबळे यास येथील जातीवादी गावगुंड रोहित दीपक जोमदे, पंकज शंकर जोमदे,महेश गहिनीनाथ जोमदे व चांद अमीर फकीर सर्व राहणार तुगाव ता.उमरगा यानी संगणमताने कट रचून जबरदस्तीने मोटरसायकलवर बसवून रोहित जोमदे यांच्या शेतातील द्राक्ष बागेच्या लोखंडी पोलला बांधून लाथा बुक्कीने काठीने व चामडी कमरपट्ट्याने जातीय द्वेशभावनेतून बेदम मारहाण करून गंभीर जखमी



केले.सदर प्रकरणी मुरूम पोलीस ठाणे येते गुन्हा दाखल असून तपास अधिकारी पोलीस उपविभागीय अधिकारी सदाशिव शेलार हे चुकीच्या पद्धतीने तपास करत असून आरोपींना अप्रत्यक्षरित्या सहकार्य करत असल्याचे दिसून येत आहे. घटना घडून पंधरा दिवस झाले तरी अद्याप मुख्य तीन आरोपी फरार आहेत. त्यांना अटकपूर्वक जामीन साठी पोलिसाकडूनच सहकार्य करत असल्याचे जाणवते. तरी या प्रकरणाती तपास अधिकारी सदाशिव शेलार यांना सह आरोपी करून त्यांना त्वरित निलंबित करावे व या प्रकरणाचा तपास जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात यावा आणि सदर प्रकरणातील सर्व फरार आरोपींना तात्काळ अटक करावे.

तसेच उंडरगाव तालुका लोहारा येथील एका दलित समाजातील अल्पवयीन सतरा वर्षाच्या मुलीचे अपहरण करून अज्ञात ठिकाणी असलेला आरोपी एक महिना झाले अजून लोहारा पोलिसांना सापडलेला नाही. या प्रकरणाचा तपासी उपविभागीय अधिकारी सदाशिव शेलार यांच्याकडेच आहे.सदर प्रकरणी ही तपास अधिकारी यांच्याकडून म्हणावा तसा तपास केला जात नाही. शिवाय यातील मुख्य दोन आरोपींना जामीन मिळवून देण्यास त्यांनी सहकार्य केले आहे. तरी याही प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देऊन या दोन्ही प्रकरणात आरोपींना सहकार्य करणाऱ्या तपास अधिकारी सदाशिव शेलार यांना त्वरित निलंबित करा अन्यथा या संदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने जिल्हाभर तीव्र आंदोलन उभे केले जाईल याची नोंद घ्यावी. जिल्हाधिकारी धाराशिव यांना दिलेल्या लेखी निवेदनावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राज्य कार्यकारणी सदस्य एस.के. चेले,जि.प. चे माजी समाज कल्याण सभापती हरीश डावरे, रिपाइंचे जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब म्हस्के जिल्हा सचिव एस.के. गायकवाड,,रिपाइंचे तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे, रिपाइंचे धीरज बेळंबकर यशवंत भंडारे,संजय कांबळे, सामाजिक कार्यकर्ते उमेश गायकवाड,अरविंद लोखंडे,नागसेन कांबळे, नीलकंठ कांबळे,सदाशिव कांबळे सह कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

सरद निवेदनाच्या प्रती माननीय नामदार रामदासजी आठवले साहेब सामाजिक न्याय तथा अधिकारता राज्यमंत्री भारत सरकार, माननीय देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री तथा गृहमंत्री महाराष्ट्र राज्य, माननीय संजय शिरसाट सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य जिल्हा पोलीस अधीक्षक धाराशिव यांना माहितीस्तव देण्यात आलेल्या आहेत.

# दुधनी रिपाइं च्या वतीने ना.रामदास आठवले यांचा सत्कार संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधानी/प्रतिनिधी:रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले गट) चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.ना. रामदासजी आठवले साहेब यांच्या कर्नाटकातील कलबुर्गी येथे विश्वशातीदूत भगवान गौतम बुध्द जगज्योती महात्मा बसवेश्वर आणी परमपूज्य बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त आले असता दूधनी टीमच्या वतीने सत्कार करून स्वागत करण्यात आली.यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,माजी सभापती आनंदराव सोनकांबळे, संतोष धोंडमनी,लक्ष्मण गवंडी, माईंदीमय जिडांगे, निंगप्पा निंबाळ, दत्ता कांबळे, रमेश दोधामनी ,गौतम सक्कर्गी, अनिल होसमनी ,राहुल झळकी, विश्वनाथ रेऊर, चंदू झळकी, कल्याणी झळकी,सम्राट झळकी,व गावातील नागरिक मोट्या प्रमाणत उपस्थिती होते

# वाढदिवसानिमित्त ६०० देशी वृक्ष लागवडीचा संकल्प; पर्यावरण संवर्धनाचा आदर्श उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येकाने वाढदिवस, स्मृतिदिन व इतर आनंदाच्या प्रसंगी वृक्ष लागवड करून पर्यावरण संवर्धनासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन भारतीय लहुजी सेनेचे तालुकाध्यक्ष अनिल झंपले यांनी केले.

सामाजिक कार्यकर्ते वसंत देडे यांनी वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून वृक्षारोपणाचा सामाजिक उपक्रम हाती घेतला. सांगवी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील कोळीबेट येथे हा उपक्रम राबविण्यात आला. या अंतर्गत सुमारे ६०० देशी वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला असून पहिल्या टप्प्यात शंभर झाडे लावण्यात आली.



या वृक्षारोपण मोहिमेत वड, पिंपळ, उंबर, पळस, करवंद, जांभूळ आणि आंबा आदी विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासोबतच जैवविविधतेचे जतन करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी भारतीय लहुजी सेनेचे तालुकाध्यक्ष अनिल झंपले, टिल्लू नाईकनवरे, वाघमारे, संतोष बावने आणि श्रीकांत पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करून समाजासमोर आदर्श निर्माण करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते वसंत देडे यांच्या या उपक्रमाचे परिसरात सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. हा उपक्रम पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यास आणि वृक्षसंवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्यास निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७३ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न**

# गुलामगिरीच्या निर्मूलनासाठी राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांचे तत्त्वज्ञान समजून घेणे आवश्यक : बी. बी. मेश्राम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने गुलामगिरी ग्रंथाच्या १५३ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ निग्रोंना का अर्पण केला असावा? या ऐतिहासिक व समकालीन विषयावर आयोजित १७३ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा साकेतनगर येथील संस्थेच्या कार्यालयात उत्साहात पार पडली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम होते. अध्यक्षीय मार्गदर्शनात त्यांनी सांगितले की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी 'गुलामगिरी' या ग्रंथाच्या प्रारंभीच अमेरिकेतील सदाचारी लोकांनी गुलामांना दास्यत्वातून मुक्त करण्यासाठी दाखविलेल्या औदार्य, निरपेक्षता आणि परोपकारबुद्धीचा गौरव केला आहे. त्यांच्या सन्मानार्थ हा ग्रंथ अर्पण करण्यात आला असून, भारतीय शूद्र–अतिशूद्र समाजालाही गुलामगिरीविरोधी संघर्षाची प्रेरणा मिळावी हा त्यामागील उद्देश होता.

मेश्राम पुढे म्हणाले की, गुलामगिरी स्वीकारल्याने माणसाचे सद्गुण नष्ट होतात, असे होमर यांनी नमूद केले आहे. याच पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या, तो बंड करून उठेल' असा विचार मांडला. अमेरिकेत रंगभेदाच्या स्वरूपात तर भारतात जात आणि अस्पृश्यतेच्या माध्यमातून गुलामगिरीची पाळेमुळे रुजलेली आहेत. या व्यवस्थेच्या निर्मूलनासाठी महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि पुढे सार्वजनिक सत्यधर्माची मांडणी करून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखविला. त्यामुळे गुलामगिरीच्या निर्मूलनासाठी महात्मा फुले यांचे तत्त्वज्ञान समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उद्घाटनपर भाषणात प्रा. शिवम गायकवाड यांनी प्राचीन काळातील अत्याचारांची उदाहरणे देत गुलामगिरीची भीषणता स्पष्ट केली. जगातील इतर गुलामगिरीच्या तुलनेत भारतातील जातीय गुलामगिरी अधिक भयावह असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रमुख वक्ते ॲड. धनेश गवळी यांनी भारतीय समाजव्यवस्थेवर गुलामगिरी ही एक घातक कीड असल्याचे सांगितले. समाज परिवर्तनासाठी प्रत्येकाने स्वतःमध्ये बंडाची वृत्ती निर्माण करून अन्यायकारी व्यवस्थेविरुद्ध उभे राहण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. यावेळी समन्वयक विलास रामटेके यांनी दीर्घकाळाच्या शोषणामुळे सामाजिक गुलामगिरी कशी बळकट झाली यावर भाष्य केले. ॲड. सुनीलकुमार नागवंश यांनी कष्टकरी वर्गाच्या श्रमांवरच जगाची उभारणी झाल्याचे सांगत स्वातंत्र्यानंतरही बहुतांश जनता विविध प्रकारच्या गुलामगिरीत जीवन जगत असल्याची खंत व्यक्त केली. तसेच फोडा आणि राज्य करा या राजकारणामुळे लोकशाही व शिक्षणव्यवस्था धोक्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. विकास खंदारे यांनी अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता वाढविणाऱ्या व्यवस्थेला तिलांजली देऊन वैज्ञानिक व सामाजिक विचारांचा प्रसार करण्याचे आवाहन केले. राज गायकवाड यांनी धार्मिक व राजकीय गुलामगिरीतून मुक्त होण्याची गरज व्यक्त केली, तर ॲड. डी. बी. मेश्राम यांनी मानसिक गुलामगिरीचे अस्तित्व अधोरेखित करून मानसिकतेत परिवर्तन घडविण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक उद्योजक मिलिंद बागुल यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके यांनी तर आभार प्रदर्शन ॲड. सुनीलकुमार नागवंश यांनी केले.

## विरशैव लिंगायत समाजातील नागरीकांना एकत्रीत आणण्यासाठी संघटनात्मक बांधणी करणार : संजय बताले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना यांच्या माध्यमातून धाराशिव दक्षिण विभाग जिल्ह्यामध्ये समाजाच्या अनेक प्रश्नावरती उकल करून संबंधित तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्याशी भेट घेऊन अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना समाजाच्या न्याय हक्कासाठी प्रश्न मांडणार आहोत प्रत्येक गावोगावी बैठकी घेऊन समाजामध्ये सामंजस्याने दूर करून समाजाची वज्रमुठ करणार आसल्याचे मत व्यक्त केले.

समाजातील संघटनात्मक बांधणी करून समाज बळकट करण्याचा प्रामाणिक प्रयत्न

**गाव तिथे शाखा व समाजाच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरण्याचा निर्धार**

आम्ही करणार आहोत शिवाय भारतीय जनगणना करत आसताना फार्म कसा भरायचा हे समाजा समोर मांडणी करणार आहोत सामाजासाठी मठ मंदिर , उभारणी आर्थिक विकास महामंडळ निर्मिती गावोगावी दफन भूमीचे काम असो अनेक प्रश्न या ठिकाणी उचलणार असून धाराशिवच्या दक्षिण विभागामध्ये प्रत्येक गावामध्ये शिवा संघटनेच्या गाव तिथे शाखा स्थापन करून संबंधित समाजाच्या न्याय हक्कासाठी किंवा उन्नती लढणार आहोत मागून जरी न्याय मिळत नसेल तर आमची रस्त्यावर उतरण्याची सुद्धा तयारी दाखवणार असल्याचे मत शिवा संघटनेचे निर्वाचित जिल्हाध्यक्ष संजय बताले यांनी पत्रकार परिषदेत बोलतांना व्यक्त केले.

आप्पासाहेब पाटील माजी सरपंच दहिटणा, आण्णासाहेब आलुरे, निलय्या स्वामी, संतोष वाले, सुभाष कोळी , संगमेश्वर व्हनाळे, अविनाश पाटील, युवराज साखरे, अनिल मुळे, बसवेश्वर पाटील, सुजित बिराजदार, किशोर गोवे, संतोष बताले, परमेश्वर गबुरे, सुशांत राजमाने, सोनू वाले, सोमनाथ बताले, अॅड समन, गणेश मुळे, अॅड. आनंद बताले, राहुल बताले, महेश बताले, सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# वादळी वाऱ्याने नागझरी येथील केळी पिकाचे अतोनात नुकसान

## पंचनाम्यानंतर शासनाकडून मदतीची अपेक्षा



> एक वर्षा पुर्वी दीड ते दोन एकरात केळी बागाची लागवड केली असता तिन लाखा पर्यंत खर्च केला असून. मोठ मोठ्या घडानी केळी बाग बहरला होता . १जुन रोजी वादळी वारा आल्याने. हाती आलेला केळी बाग भुईसपाट झाल्याने होत्याचे नव्हते झाले. शासकीय कर्मचारी यांनी पंचनामा करून अहवाल पाठविला आहे. करीता पंचनाम्या नंतर शासनाकडून भरीव मदतीची अपेक्षा आहे
>
> – शेतकरी मधुकर उत्तमराव वाघ
> मु.नागझरी पो.दरेगाव . तालुका सिंदखेडराजा जिल्हा बुलढाणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील काही गावांना १ जुन रोजी वादळी वाऱ्याचा तडाखा बसला असून त्यात बागायती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. सिंदखेडराजा तालुक्यातील नागझरी येथील शेतकऱ्यांचे केळी पिकाचे अतोनात नुकसान झाले असून शेतकरी संकटात सापडला आहे. नागझरी येथील शेतकरी मधुकर उत्तमराव वाघ. यांचे दरेगाव शिवारातील गट क्रमांक. १७२ मधिल दिड ते दोन एकरातील .केळी बागेचे मोठे नुकसान झाले आहे. केळी बागेला मोठ मोठे घड लागले असताना रात्री साडे आठ वाजेपासून सुरू झालेल्या साडे नऊ वाजेपर्यंत चाललेल्या वादळी वाऱ्याने. केळी बाग मोडून पडल्याने शेतकरी मधुकर वाघ यांचे केळी बाग भुईसपाट झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच . कृषी साह्यक. स्वाती सोनूने. महसूल अधिकारी ज्ञानेश्वर दांडगे. ग्राम सचिव.निंबाजी इंगळे. यांनी घटनास्थळी भेट देऊन.पंचनामा केला प्राथमिक अहवालानुसार अंदाजे नुसकान .१०लाख रुपायांचे झाले असून सांगण्यात येत आहे. नागझरी येथील शेतकरी शेड नेट साठी तालुक्यात नेहमिच अग्रेसर असतात. वादळी वाऱ्याने शेड नेट सुद्धा हवेत उडून गेल्याची माहिती मिळत आहे.

# विद्यार्थी शिक्षक आणि पालकाच्या त्रिसूत्रीमुळे यश : प्रा. आर.एन. कुलकर्णी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत निकाल आठ मे २०२६ रोजी जाहीर झाला या परीक्षेत उल्लेखनीय संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा मंगळवेढा येथील नूतन मराठी माध्यमिक विद्यालय उत्साहात पार पडला यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शैक्षणिक साहित्य देऊन करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक आर्यन कुलकर्णी सचिव आप्पासाहेब महालगेरी आणि संचालक सुरेश जोशी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला यावेळी मार्गदर्शन करताना प्रा कुलकर्णी म्हणाली की शाळेच्या नावलौकिक वाढवण्याचे गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांना योग्य दिशा देणारे शिक्षक आणि पाठबळ देणारी पालखी यांची भूमिका अत्यंत महत्त्वाचे असते. विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण अभ्यास व शिक्षकांचे मार्गदर्शन, व पालकांचा विश्वास व योग्य नियोजन या सर्व घटकांचा या सर्व प्रयत्नातून यशाचा मार्ग निघत असतो.

यावेळी दहावी परीक्षेत उल्लेखनीय संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष सत्कार करण्यात आला यावेळी कुमारी प्रज्ञा नागनाथ कुदळे ९५.३०%, हिरे प्रथम क्रमांक, कुमारी आर्या प्रशांत जगताप ९१.२०% तिने द्वितीय क्रमांक, तर अजय किसान पांढरे ९०% यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

**नूतन मराठी विद्यालय गुणवंताचा गौरव**

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रज्ञा कुदळे यांचे पालक नागनाथ कुदळे यांनी मनोगत व्यक्त करताना शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्राप्त करता येते असे सांगून शिक्षक व संस्थे प्रती कृतज्ञता व्यक्त केली. उद्या सर्वच गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक गुरुजी बंडगर, वर्गशिक्षक अवंती पटवर्धन, प्रशिक्षक सुभाष गायकवाड, योगेश कुलकर्णी उत्तम जमखंडी, श्रीराम पाटील यांच्यासह पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन अवंती पटवर्धन यांनी केले व कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सतीश कजगावणे वैभव खांडेकर यांनी विशेष परीक्षा घेतल्या व कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना गुणपत्रक व प्रमाणपत्राची वितरण करण्यात आले.

करा गौरव सोहळा विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद साजरा करणारा आणि भावी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

## लाडकी बहीण योजनेचा गैरलाभ घेणाऱ्या पुरुषांना माफी नाही!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारची अत्यंत यशस्वी आणि महिलांना समाजात मान मिळवून देणारी योजना आहे. या योजनेसाठी जनतेचा पैसा वापरला जात असून त्याचे रीतसर ऑडिट होते. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करून या योजनेचा गैरलाभ घेणाऱ्या पुरुषांना कोणत्याही परिस्थितीत माफी दिली जाणार नाही; त्यांच्याकडून पैसे वसूल केले जातील,'' अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली.

मुंबईत आयोजित एका विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. या योजनेच्या छाननी प्रक्रियेबाबत माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आम्ही कोणालाही जाणीवपूर्वक वगळलेले नाही. योजना सुरू करतानाच उत्पन्न आणि वयाचे निकष स्पष्ट होते आणि सुरुवातीला स्वयंघोषणेच्या आधारे महिलांना लाभ देण्यात आला. त्यानंतर ई-केवायसीसाठी वारंवार मुदतवाढ देऊन तब्बल आठ महिन्यांचा कालावधी देण्यात आला. परंतु, डेटाबेस तपासल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये तब्बल १४ हजार पुरुष, ५ लाख सरकारी कर्मचारी आणि १० लाख आयकर (इन्कम टॅक्स) भरणारे लोक आढळले आहेत. याशिवाय ४ ते ५ लाख लाभार्थी असे आहेत ज्यांच्या नावावर चारचाकी गाड्या आहेत. यातील अनेकांनी केवायसी टाळले होते, त्यामुळे त्यांचे पैसे तूर्तास थांबवण्यात आले आहेत.

## ग्रामस्थांच्या सहकार्याने जि. प. प्रशाला ईटकुरच्या खेळाडू विद्यार्थ्यांना स्पोर्ट किटचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ईटकुर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब कळंब तालुक्यातील ईटकुर येथे दि.२ जून रोजी जि प प्रशाला शाळेमधील विविध खेळात सहभागी होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना स्पोर्ट किट जर्सी चे वाटप करण्यात आले.

प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवल्यानंतर प्रेरित झालेल्या विद्यार्थ्यांची विविध खेळातील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सर्वांची जोरदार तयारी सुरू झाली हा खेळाचा सराव करण्यासाठी विद्यार्थ्यांना पोर्ट किट जर्सीची गरज होती ही अडचण लक्षात घेता प्रशालेतील खेळाचे मार्गदर्शक अनिल शिंदे यांनी ईटकुर गावचे सुपुत्र पत्रकार बालाजी आडसुळ यांच्याशी याबाबत चर्चा केली लागलीच याबाबत त्यांनी प्रशालेच्या वतीने ईटकुर ग्रामस्थांना सहकार्याचे आवाहन केले, शिक्षण प्रेमी जागरूक नागरिक यांच्याकडून तात्काळ मदतीचा ओघ सुरू झाला यात ६० हजार रुपये लोक वर्गणी जमा झाली यातून शंभर विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण स्पोर्ट किट खरेदी करण्यात आले व ते सहकार्य करणाऱ्या सर्व ग्रामस्थांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले, याप्रसंगी यासाठी सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचा पुष्पगुच्छ देऊन प्रशालेच्या वतीने सन्मान ही करण्यात आला. यावेळी, सी जे शिंदे सर कोठावळे सर, वल्लभ पोते, कदम साहेब यांनीही,आपले मत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी प्रशालेचे माजी मुख्याध्यापक सी. जे. शिंदे, मुख्याध्यापक गणेश कोठावळे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरिदास पावले उपाध्यक्ष बिभीषण देसाई व सर्व सदस्य तसेच ग्रामस्थ, प्रशालेचे सर्व शिक्षक, कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल शिंदे सर यांनी तर, आभार प्रदर्शन गावकरे सर यांनी केले.

किट साठी देणगी देणारे दानशूर व्यक्ती खालील प्रमाणे......


१)इजिं. दत्तात्रय आडसूळ -१५००१
२)सुंदर आडसूळ ५००१
३)मनोज कदम -५००१
४)मोहन क्षिरसागर -२१००
५)वैभव आडसुळ -२१००
६)हरीदास (दादा)पावले -२००१
७)बाबासाहेब जगताप -२००१
८)डॉ रजनीश गाडे १००१
९)प्रा डॉ विलास आडसूळ १००१
१०)अमर आडसूळ १००१
११)डॉ प्रभाकर आडसूळ १००१
१२)मल्हारी गायके १००१
१३)इजिं सचिन आडसूळ १००१
१४)मेजर गुणवंत माने १००१
१५)हनुमंत कदम १००१
१६)संतोष आडसूळ १००१
१७)डॉ हनुमंत गंभिरे १००१
१८)राजू तांबोळी १००१
१९)अमरजीत आडसूळ १००१
२०) बिभीषण देसाई -१००१
२१) अभिषेक गुजर -१००१
२२)कुंडलीक राक्षे -१००१
२३)सुधाकर रणदिवे -५५१
२४) ओंकार पोते -५११
२५) रावसाहेब (बंडू) गंभीरे ५०१
२६) हेमंत पोते -११०१
२७)दत्तात्रय गंभीरे ५५१

**खाजगी विकासकाच्या फायद्यासाठी सामान्यांच्या जीवाशी खेळ? एमएमआरडीएच्या कारभारावर आरोप**

# पहिल्याच पावसात पडघा-अंबाडी रस्त्याची दुरवस्था; अर्धवट कामामुळे अनेक दुचाकीस्वार घसरले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पावसाळा अधिकृतपणे सुरू होण्यापूर्वीच झालेल्या पहिल्याच पावसाने पडघा-अंबाडी रस्त्याची दैना उडवली आहे. एमएमआरडीएच्या अखत्यारीतील या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने व अर्धवट अवस्थेत सुरू असल्याने संपूर्ण रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. चिखल व खड्ड्यांमुळे अनेक दुचाकीस्वार घसरून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. सुदैवाने यात किरकोळ दुखापती झाल्या, मात्र स्थानिक ग्रामस्थ व नोकरदारांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. या प्रकरणामागे धक्कादायक बाब समोर आली आहे. सामाजिक कार्यकर्ते भगवान



सांबरे यांच्या आरोपानुसार, एका खाजगी विकासकाला फायदा करून देण्यासाठी रस्त्याचे काम जाणीवपूर्वक रेंगाळत ठेवण्यात आले आहे. रस्त्याच्या मध्यभागी खाजगी विकासकाच्या प्रकल्पासाठी ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम सध्या सुरू आहे. या खोदकामामुळेच मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली असून पावसाचे पाणी साचून दलदल निर्माण झाली आहे. माध्यमांशी बोलताना भगवान सांबरे यांनी प्रशासनाला धारेवर धरले. रस्त्याच्या मधोमध जी खाजगी विकासकाची ड्रेनेज लाईन टाकली जात आहे, त्याला कोणतीही कायदेशीर किंवा प्रशासकीय मान्यता नाही. कोणत्याही परवानगीशिवाय मुख्य रस्त्यावर बेकायदेशीर काम सुरू असताना एमएमआरडीए प्रशासन डोळेझाक का करत आहे? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. जनतेच्या जीवाशी खेळ; आर्थिक हितसंबंधांचा संशय पहिल्याच पावसाने चाकरमानी, शाळकरी मुले व आजूबाजूच्या गावांतील नागरिकांचे हाल केले आहेत. एका खाजगी विकासकाच्या फायद्यासाठी हजारो सामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा परवाना प्रशासनाने दिला आहे का? या बेकायदेशीर कामामागे नेमके कोणते आर्थिक हितसंबंध दडले आहेत? असा सवाल आता स्थानिक जनतेतून व सामाजिक वर्तुळातून विचारला जात आहे.

पावसाळा पूर्णपणे सुरू झाल्यानंतर परिस्थिती आणखी भीषण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे एमएमआरडीएने तातडीने या बेकायदेशीर कामावर कारवाई करून रस्त्याची दुरुस्ती करावी व वाहतूक सुरक्षित करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

## विधान परिषदेची उमेदवारी न मिळाल्यांना नाराज नेत्यांची वर्णी महामंडळ समितीवर लागणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्यात माहिती सत्ता आहे त्यामुळे निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या सतरा विधान परिषदेच्या जागेसाठी अनेक जण इच्छुक होते. मात्र १७ जागेवर सातारा उमेदवार द्यायचे असल्यामुळे अनेकांना निवडणूक उमेदवारी मिळण्याची संधी मिळाली नाही. अनेक नेते नाराज आहेत व नेत्यांना महामंडळ समितीवर यांना घेण्यात येणार आहे.

राज्यात १७ विधानपरिषद जागेची निवडणूक जाहीर केल्या असल्याने राज्यात माहिती सत्ता आहे त्यामुळे महायुतीचा उमेदवार विजय होणार हे निश्चित आहे म्हणून आपणास उमेदवारी मिळावी म्हणून अनेक जण इच्छुक होते. १७ जागा असल्यामुळे स्वतः जागेचा पेच अनेक दिवस चाललेला होता. अकिरा हा पेज सुटला असून भाजपला ११ जागा व शिंदे शिवसेनाला चार जागा तर राष्ट्रवादी अजित पवार गटाला दोन जागा देण्यात येणार आहेत ते विधानपरिषद निवडणूक २५ जूनला होणार आहे नाराज असणाऱ्या नेते व पदाधिकारी कार्यकर्ते यांना महामंडळ व समित्यावर यांची निवड करण्यात येणार आहे असे दिसून येत आहे.